आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२४ ऑगस्ट २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- युक्रेन दौरा यशस्वीपणे पूर्ण करुन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मायदेशी आगमन
- युक्रेन शांतिपरिषदेची दुसरी फेरी भारतात घेण्याचा वोलोदिमीर झेलेन्सकी यांचा प्रस्ताव
- मन की बात या कार्यक्रमातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या देशवासियांशी संवाद साधणार
- नेपाळमध्ये अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांचे मृतदेह भारतीय हवाई दलाच्या विमानाने देशात परत आणले जाणार

**आणि**

- भारतीय क्रिकेटपटू शिखर धवनची आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांमधून निवृत्ती

**<><><><><>**

शांतता प्रस्थापित करण्यावर भारताचा दृढ विश्वास असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. युक्रेन दौरा यशस्वीपणे पूर्ण करुन प्रधानमंत्री आज मायदेशी परतले. युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्याशी विधायक चर्चा झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावर लिहीलं असून युक्रेनमधल्या पाहुणचाराबद्दल आभार व्यक्त केले आहेत.

रशिया युक्रेन संघर्ष थांबवण्यासाठी भारत महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतो असं युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी म्हटलं आहे. युक्रेन शांतिपरिषदेची दुसरी फेरी भारतात घ्यावी, असा प्रस्ताव आपण मोदी यांच्याशी चर्चेदरम्यान मांडला

असं झेलेन्स्की यांनी काल कीव्ह मधे पत्रकारपरिषदेत सांगितलं. त्यावेळी शांतिस्थापनेच्या कोणत्याही प्रयत्नाला भारताचा पाठिंबा राहील असं मोदी यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा दौरा युक्रेन रशिया संघर्षावर तोडगा काढण्यात सहाय्यभूत ठरेल, असं अमेरिकेनं म्हटलं आहे. हा संघर्ष थांबवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही देशाचं स्वागत असल्याचं अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जॉन किर्बी यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी अमेरिकेत वॉशिंग्टन डीसी इथं अमेरिकेचे संरक्षण सचिव लॉईड ऑस्टीन यांची भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये संरक्षण सहकार्य, उद्योग, प्रादेशिक सुरक्षा आणि इतर आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर द्विपक्षीय चर्चा झाली. या चर्चेदरम्यान, राजनाथ सिंह यांनी दोन्ही देशांदरम्यानच्या विकासाच्या संधींवर भर दिला. दोन्ही देशांदरम्यान झालेल्या S.O.S.A अर्थात सुरक्षा पुरवठा व्यवस्थेबद्दल लॉईड आणि राजनाथ सिंह यांनी समाधान व्यक्त केलं.

**<><><><><>**

जगातले विकसित देश मंदी आणि महागाईचा सामना करत असताना भारत त्यामानाने सुस्थितीत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी केलं. W.I.R.C अर्थात पश्चिम भारत प्रादेशिक कौन्सिलच्या ३८ व्या परिषदेत, 'विकसित भारत : २०४७' या विषयावर गोयल काल बोलत होते. भारताच्या वाढीचा दर सात टक्के राहील असा अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं व्यक्त केला आहे, भारत हे जगाचं आशास्थान असल्याचं गोयल म्हणाले.

**<><><><><>**

नागरिकांना चांगल्या गुणवत्तेची दूरसंचार सेवा मिळण्यासाठी सर्व दूरसंचार सेवा पुरवठादारांनी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशा सूचना केंद्रीय दूर संपर्क मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी दिल्या आहेत. शिंदे यांनी दूरसंचार सेवा पुरवठादारांसोबत काल नवी दिल्ली इथं बैठक घेतली, त्यावेळी ते बोलत होते. सेवेची गुणवत्ता आणि दूरसंचार सेवेला एका उंचीवर घेऊन जाण्यासाठीचं भारताचं सीक्स-G च्या ध्येयाबद्दल शिंदे यांनी चर्चा केली. देशात शंभर टक्के ब्रॉडबँड कव्हरेज करण्यासाठी सहाय्यक ठरणारं धोरण आखण्याची मागणी यावेळी दूरसंचार पुरवठादारांनी केली.

**<><><><><>**

कृत्रिम वस्त्र हे आपल्या दैंनदिन जीवनाचा भाग बनले आहे. देशातल्या मध्यमवर्गीयांच्या राहणीमानात सुधारणा झाल्यामुळे त्याची मागणी वाढत आहे, असं केंद्रीय वस्त्रोद्योगमंत्री गिरीराज सिंह यांनी सांगितलं. ते मुंबईत आयोजित केलेल्या

१० व्या नॉन वोवन टेक आशिया आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात बोलत होते. कृत्रिम वस्त्र उत्पादनांद्वारे कृषी, आरोग्य, स्वच्छता आणि गाळण प्रक्रिया या क्षेत्रात नाविन्य आणण्याची गरज असल्याचं सांगत त्यांनी वाढीव रोजगार निर्मितीमध्ये कृत्रिम वस्त्र क्षेत्राची भूमिका स्पष्ट केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून जनतेशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११३ वा भाग असेल.

**<><><><><>**

नेपाळमधल्या अपघातग्रस्तांना भारतात परत आणण्याच्या प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी युवा कल्याण आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे नेपाळची राजधानी काठमांडू इथं पोहोचल्या आहेत. त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळावर त्यांनी भारताचे नेपाळमधले राजदूत नवीन श्रीवास्तव आणि नेपाळच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सहायक सचिव बृघू धुंगना यांच्याशी मदत कार्य आणि पुढच्या कार्यवाहीबाबत चर्चा केली. तसंच अपघातातल्या जखमींवर उपचार सुरू असलेल्या त्रिभुवन विद्यापीठ रुग्णालयालाही भेट दिली. काठमांडूतल्या भारतीय दूतावासाने दिलेल्या माहितीनुसार या दुर्घटनेत २७ भारतीय नागरिक मृत्युमुखी पडले. यात महाराष्ट्राच्या जळगाव जिल्ह्यातल्या २४ जणांचा समावेश आहे. महाराष्ट्र सरकारच्या विनंतीनुसार त्यांचे मृतदेह भारतीय हवाई दलाच्या विमानाने भारतात आणले जाणार आहेत.

दरम्यान, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. भारतीय दूतावास अपघातग्रस्तांना आवश्यक ती सर्व मदत करत असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणात सरकारनं आरोपीला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. मुंबईत दादर इथं शिवसेना भवनासमोर बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणाचा निषेध करण्यासाठी आंदोलन करण्यात आलं, त्यावेळी ठाकरे बोलत होते. महाविकास आघाडीचा महाराष्ट्र बंद यशस्वी होणार असल्याने त्याविरोधात न्यायालयात याचिका दाखल करून अडथळा आणण्यात आल्याचा आरोपही ठाकरे यांनी केला. आपला बंद हा राज्यातल्या महिला, मुली सुरक्षित राहाव्यात यासाठी होता, असं सांगत राज्यातल्या गावागावात जाऊन या अत्याचाराचा निषेध करण्याचं आवाहनही ठाकरे यांनी केलं.

**<><><><><>**

बहुउपयोगी एम एच ६० सिहॉक हेलिकॉप्टर श्रेणीतल्या ५ कोटी २८ लाख अमेरीकी डॉलर एवढ्या किंमतीची पाणबुडीविरोधी लढाऊ यंत्रणेच्या परदेशी लष्करी विक्री प्रक्रियेला अमेरिकेनं मंजुरी दिली आहे. अमेरिकेचे राज्य सचिव अँथनी ब्लिंकन यांनी याबाबत पुढाकार घेतला. अमेरिकी काँग्रेसच्या परवानगीने संरक्षण सुरक्षा सहकार्य संस्थेनं याबाबतची मंजुरी प्रमाणपत्र प्रक्रिया पूर्ण केली. यामुळे संरक्षण भागीदारी प्रक्रियेतला महत्वपूर्ण सहकारी असलेल्या भारतासोबत

द्विपक्षीय धोरणात्मक संबंध मजबूत करण्यासह वॉशिंग्टनचं परराष्ट्र धोरणही मजबूत होणार असल्याचं अमेरिकी प्रशासनानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

आसाममधल्या धिंग इथं अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या मुख्य आरोपीचा आज सकाळी मृत्यू झाला. गुन्ह्याचा तपास चालू असताना आरोपी घटनास्थळावरून पळून गेला. त्यानंतर त्याने तलावात उडी मारल्याने त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या मदतीने त्याचा मृतदेह बाहेर काढला. नागाव जिल्ह्यातील धिंग इथल्या या गुन्ह्यात तीन जणांचा कथित सहभाग असल्याचे वृत्त आहे. उर्वरित आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत. या गुन्ह्यातील आरोपींवर कडक कारवाई केली जाईल, असं मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

यूनायटेड नेशन्स रिलीफ अँड वर्क्स एजन्सी या पॅलेस्टाईन निर्वासितांसाठी काम करणाऱ्या संघटनेनं गाझामध्ये पोलिओचा उद्रेक होण्याची चिंता व्यक्त केली आहे. पोलिओ लसीचा अपुरा पुरवठा आणि शीत साखळीचा अभाव यामुळे तिथल्या बालकांमध्ये रोगाचा प्रादुर्भाव होत आहे. महिना अखेरीस गाझा मधल्या १० वर्षां आतील ६ लाख ४० हजारांहून अधिक बालकांसाठी २ टप्प्यात लसीकरण मोहीम राबवण्यात येईल अशी माहिती संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस एंटोनिओ गुटेरस यांनी दिली.

**<><><><><>**

पंडित कुमार गंधर्व स्मृती महोत्सव आजपासून दोन दिवस मध्यप्रदेशात देवास इथं आयोजित करण्यात येत आहे. या समारंभात प्रसिद्ध गायिका विदुषी सुधा रघुरामन यांना कुमार गंधर्व राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. देशाच्या विविध भागातल्या कलाकारांचे कार्यक्रम महोत्सवात होणार आहेत. त्यात शांतनु गोखले यांचं तबला वादन, शुभदा पराडकर यांचं गायन, नीलाद्रीकुमार यांचं सतार वादन यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

जॉर्डनची राजधानी अम्मान इथं सुरू असलेल्या १७ वर्षांखालच्या कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय महिला कुस्तीपटूंनी १८५ गुणांसह पहिल्यावहिल्या सांघिक अजिंक्यपदाला गवसणी घातली. भारताच्या काजलनं युक्रेनच्या प्रतिस्पर्ध्यावर ९-२ अशी मात करून स्पर्धेतलं पाचवं सुवर्णपदक भारताला मिळवून दिलं. याआधीच्या सामन्यांमध्ये अदिती कुमारी, नेहा, पुलकित आणि मानसी लाथेर यांनी आपापल्या वजनी गटात सुवर्णपदकावर नाव कोरलं. श्रुतिका पटेल हिला मात्र रौप्यपदकावर समाधान मानावं लागलं. राजबाला आणि मुस्कान या दोघींनी आपापल्या वजनी गटात कास्यपदक मिळवलं. स्पर्धेत भारतानं पाच सुवर्ण, एक रौप्य आणि दोन कास्य अशी एकंदर ८ पदकं पटकावली. जपाननं १४६ गुणांसह दुसरा, तर कझाकस्ताननं ७९ गुणांसह तिसरा क्रमांक मिळवला.

**<><><><><>**

भारतीय क्रिकेटपटू शिखर धवननं आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांमधून तसंच देशांतर्गत क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय जाहीर केला. समाजमाध्यमांवर प्रसारित केलेल्या एका चित्रफितीद्वारे धवनने निवृत्तीचा निर्णय

जाहीर केला. चाहत्यांच्या प्रेम आणि पाठिंब्याबद्दल शिखर धवनने कृतज्ञता व्यक्त केली. त्याने डिसेंबर २०२२ मध्ये बांगलादेश विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत भारताकडून शेवटचा सामना खेळला होता. धवनने २०१० ते २०२२ पर्यंत ३४ कसोटी, १६७ एकदिवसीय सामने आणि ६६ टी-ट्वेंटी सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केलं आहे.

**<><><><><>**

गुजरात, मध्य प्रदेश, त्रिपुरा आणि मिझोरम इथं उद्या अतिवृष्टी होण्याचा इशारा हवामान खात्यानं दिला आहे. कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, झारखंड, ओदिशा, पश्चिम बंगाल, मेघालय आणि पूर्व राजस्थानात मुसळधार पावसाची शक्यताही हवामान खात्यानं व्यक्त केली आहे. तर उत्तर प्रदेश, पश्चिम राजस्थान, हिमाचल प्रदेश, अरुणाचल प्रदेश, सिक्कीम आणि बिहार इथं आठवड्याभरात मुसळधार पावसाची शक्यताही हवामान खात्यानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**